# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/2264115 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@gmail.com Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


(२०१५-डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष)

**अधिसूचना**

क्रमांक : 2अ/एडीएम/जनरल अधिसूचना /प्रमाणपत्रे/2015/712
दिनांक : 22.05.2015

**विषय : शैक्षणिक वर्ष 2015-16 मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत...**

शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी ,थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए इ.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांस केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावीत.

- **जात प्रमाणपत्र (Caste Certificate) : सर्व मागासवर्गीय उमेदवारांना सर्व अभ्यासक्रमासाठी लागू :**

***मागास प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार हे महाराष्ट्र राज्यातीलच असावेत.*** त्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी उमेदवाराची जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्याच्या नावाने दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.

- **नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र : (Non-Creamy Layer Certificate) :**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले दि.31/03/2016 पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) उपरोक्त नमूद केलेल्या सर्व अभ्यासक्रमासाठी लागू राहील.

- **जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) :**

उपरोक्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मागासवर्गीय उमेदवारांना राखीव जागांवर प्रवेश घ्यावयाचा असल्यास महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

- **अधिवास प्रमाणपत्राबाबत (Domicile Certificate)**

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी टाईप ए विद्यार्थ्यांच्या बाबतीत अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असली तरी अधिवास प्रमाणपत्र विद्यार्थ्यांकडे उपलब्ध नसल्यास त्या विद्यार्थ्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला (बर्थ सर्टिफिकेट) किंवा शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील परंतू शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या विद्यार्थ्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

**संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीच्यावेळी जर आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित उमेदवार सादर करु शकला नाही, तर त्यास संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाचा फायदा मिळणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.**

प्रवेशाबाबतची इतर सर्व माहिती या संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.अधिक माहितीसाठी या संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडेही संपर्क साधता येईल.

प्रवेशाबाबत अधिसूचनांची व इतर माहितीसाठी संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

| | | |
|---|---|---|
| मुंबई --022-26474892 व 26471619<br>पुणे -- 020-25656234 व 25678973 | नाशिक-- 0253-2461479, 2460114<br>औरंगाबाद--0240-2334216 , 2334769 | अमरावती--0721-2573027,<br>नागपूर-- 0712-2565143 , 2549387 |

**Sd/-**
(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई